# अंतर्मुख

महामार्गावरचा मोटारीचा प्रवास! रात्र कितीही अंधारी असली, रस्त्याचे दिवे लागलेले नसले तरीसुध्दा भलत्याच रस्त्याला लागण्याचा अपराध अक्षम्यच ठरतो.

अशा वेळी मदतीला, मार्ग दाखवायला हजर असतात त्या रस्त्याच्या कडेच्या, वाट सांगणाऱ्या फ्लुओरेसेंट पाट्या! त्या प्रकाशाची उधळण करत नाहीत; त्या एरवी अंधारात दिसतसुध्दा नाहीत. पण मोटारीच्या प्रकाशझोताचा रोख त्यांच्याकडे वळला की मात्र त्या झळाळून उठतात, मोटारवाल्याला नेमकं मार्गदर्शन करतात.

काही माणसंही अशीच असतात. ती अंतर्मुख माणसं मित्रांच्या घोळक्यात, अगदी एखाद्या प्रश्नाचा ऊहापोह चाललेला असतानाही एक शब्दही न बोलता एका बाजूला रहातात; त्या वादविवादात भाग घेत नाहीत. त्यांच्या तिथे असण्याचा लोकांना विसर पडतो. पण बोलण्याचा रोख त्यांच्याकडे वळला की मात्र त्यांच्याकडे त्या प्रश्नाचं नेमकं उत्तर तयार असतं.

गर्दीतल्या वादविवादाच्या अनुषंगाने बरीच अवांतर बडबडही चालते. तिने विषयाला नको ते फाटे फुटतात. अंतर्मुखांना मूळ विषयात रस असतो. ते बोलले नाहीत तरी त्याच विषयावर त्यांच्या अंतर्मनात एक सुसूत्र, मुद्‌देसूद संवाद चालूच असतो. त्यामुळे एक समर्पक निष्कर्ष काढणं, समस्या असली तर तिच्यावर रामबाण तोडगा मिळवणं त्यांना अबोलपणे अधिक चांगलं जमतं. तेवढ्याने त्यांचं समाधान होतं. तो विचार आपण होऊन चारचौघांत मांडायची त्यांना गरज भासत नाही. खास त्यांनाच प्रश्न विचारला गेला तर मात्र तो निष्कर्ष त्यांना रीतसर मांडता येतो. त्या विषयावर मुद्‌देसूद व्याख्यानही देता येतं.

अशी माणसं जबाबदार पदावर असली तर ती इतरांचं म्हणणं नीट ऐकून घेतात; इतरांच्या अडचणी समजून घेतात. त्यांना प्रशासनाची किंवा राज्यकारभाराचीही जाण असते. ती वाक्चातुर्य गाजवत नाहीत पण त्यांच्या सुस्पष्ट विचारांमुळे ती कंपन्यांच्या किंवा

देशांच्याही कारभाराची धुरा उत्तम रीतीने वाहू शकतात. मायक्रोसॉफ्टवाला बिल गेट्सही अंतर्मुखच आहे म्हणे.

लेखनातून, आंतरजालावरून, कलाकृतींतून इतरांच्या संपर्कात रहाणं अंतर्मुखांना सोयीचं पडतं. तिथे ते आपली मतं आपल्या सोयीनुसार मांडू शकतात. हॅरी पॉटरची जननी रॉवलिंगबाई, डार्विन, आईनस्टाईनसारखे संशोधक, घरगुती संगणकाचा जनक वॉझ्नियाक, शोपँसारखे संगीतकार ही मंडळी लाखो माणसांशी तसा संवाद साधूनही अंतर्मुखच राहिली.

अंतर्मुख माणसं आपल्या वैचारिक कर्तृत्वाने मानवजातीवर भरभरून उपकार करतात. पण  लहानपणी मात्र बहिर्मुख मुलांचंच काम सतत नजरेत भरतं; त्यांचं कौतुक होतं. अंतर्मुखांना सतत कमी लेखलं जातं; ‘लाजाळूचं झाड’, ‘माणूसघाण्या’ वगैरे टोमणे खावे लागतात; अलीकडे तर रंगमंचावर जाण्याची, ‘चारजणांत मिसळण्याची’ सक्ती होते. त्याचा त्या वयात फार त्रास होतो. निदान मोठ्यांनी तरी ते समजून घ्यायला हवं.

कुणी सांगावं, बाकीची मुलं दंगामस्ती करत असताना कोपऱ्यात गप्प बसलेला अंतर्मुख मुलगा कदाचित या शतकाचा न्यूटन किंवा गौतम बुध्द असेल! ते झाकलं माणिक हेरावं; अव्हेरू नये.

डॉ. उज्ज्वला दळवी
-ujjwalahd9@gmail.com

(पूर्वप्रसिध्दी : ’मुंबई सकाळ’)